
# मीनूची पहिली पौर्णिमा

मूळ कथा : केविन हेनकेस
मराठी अनुवाद : फारूक एस. काझी
आभार : अरविंद गुप्ता








व्वाह ! काय रात्र
आहे!
आकाशात पूर्ण चंद्र
हसतोय.
मिनूला भूक
लागलीय.
मीनू खूप चौकस
आणि धाडशी आहे.
चपळ आणि
खूप हट्टीही आहे.
कधी तिचं नशीब
जोरावर असतं तर
कधी ती कमनशिबी
ठरते.

# मीनूची पहिली पौर्णिमा.



# मीनूची पहिली पौर्णिमा


मूळ कथा : केविन हेनकेस
मराठी अनुवाद : फारूक एस. काझी
आभार : अरविंद गुप्ता






# मीनूची पहिली पौर्णिमा.

मीनूची ही पहिली
पौर्णिमा होती.
जेव्हा तिने चंद्राला पाहिलं
तेव्हा तिला चंद्र म्हणजे
दुधाची वाटीच वाटला.
तिला भूक लागली होती.
तिला दुध प्यायचं होतं.






मग तिने आपले डोळे बंद केले.
मान थोडी सरळ करून जेभेने
आपल्या मिशा चाटल्या.



तेवढ्यात तिच्या जिभेवर तिथंच
उडत असलेला एक काजवा
येऊन चिकटला.
बिच्चारी मीनू !



पण दुधाची वाटी अजूनही ......



तिचीच वाट पाहत होती.



मग तिने आळोखेपिळोखे
घेत जोरदार आळस
दिला.
आपले पाय ताणले
आणि वरच्या पायरीवरून
वाटी पकडण्यासाठी उडी
घेतली.



पण झालं काय ?
मीनू धड्डाम करून खाली पडली.
तिच्या नाकाला खरचटलं,
डोक्याला लागलं आणि तिची
शेपटी मुरगळली.

बिच्चारी मीनू......!




पण दुधाची वाटी अजूनही ......



तिचीच वाट पाहत होती.


मग तिने वाटीचा पाठलाग करायचं ठरवलं.
ती फुटपाथवरून बागेत पोचली.
मग शेतातून तळ्याकाठी पोचली.
पण तिथं कुठंच दुधाची वाटी नव्हती.

बिच्चारी मीनू !





पण दुधाची वाटी अजूनही ......



तिचीच वाट पाहत होती.


मग तिला जे
सगळयांत उंच
झाड दिसलं
त्यावर ती
चढली.
वर ,वर
अजून वरच
चढत गेली.
शेवटी ती
सगळ्यात वरच्या
फांदीवर जाऊन
पोचली.




पण तिथंही तिला
दुधाची वाटी
मिळाली नाही.
तेव्हा मीनू
घाबरली.
बिच्चारी मीनू !
ती आता दुसरं
काय करू शकत
होती?




इतक्यात झाडाच्या उंच टोकावरून
तिला अजून एक दुधाची वाटी
दिसली.
ती खूप मोठी होती.



झाडावरून सरळ
खाली उडी मारावी
असा विचार तिच्या
डोक्यात आला.
पण आधीच
डोक्याला लागलेलं,
ते टेंगुळ अजून
ठुसठुसत होतं.
मुरगळलेली शेपटी
अजून कुरकुरत
होती.
तिने उडी मारण्याचा
बेत रद्द केला.



मग ती पटपट खाली उतरली आणि गवताळ मैदानाकडे पळाली.



ती धावत-पळत तळ्याच्या काठी
येऊन पोहोचली.
आणि तिने मागचा पुढचा विचार
न करता सरळ तळ्यात उडी
मारली.


मीनूने तळ्यात उडी
घेताच दुधाची वाटी
गायब झाली.
मीनू हिरमुसली.


बिच्चारी मीनू !




ती भिजलेली होती,
उदास होती
आणि
उपाशीही.

शेवटी
हतबल
होऊन
ती
घरी
परत
आली.






ती उदास होऊन परत आली.




आणि काय मज्जा !
तिथं तिला अंगणात ठेवलेली
दुधाने भरलेली.........



मोठ्ठी वाटी दिसली.
मीनू जाम खुश झाली.

जणू काही ती वाटी
मिनूचीच वाट पाहत
होती....




लपलप करत तिने सगळं दुध
गट्टम करून टाकलं.



दुध पिऊन मीनू शांतपणे
झोपी गेली.

नशीबवान मीनू....!





व्वाह !
काय
रात्र
होती!